दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : ३०० • पुणे • बुधवार, दि. २२ जुलै २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


# भाजपचा माज उतरवून टाकू

## जरांगेंना जंतर मंतरवर विद्यार्थ्यांचा हिंदीत बोलायला आग्रह, पाटील म्हणाले, मी हिंदीत बोललो तर तुम्ही तुमची हिंदी विसराल

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत ही जागा सोडू नये. तुम्ही एकदा का ही जागा सोडलीत तर सरकार तुमचं आंदोलन मोडून काढेल, असा सल्ला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मनोज जरांगे यांनी बुधवारी दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या आंदोलनस्थळी जाऊन कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपके यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनोज जरांगे भाषणासाठी उभे राहिले तेव्हा याठिकाणी असलेले अनेक अमराठी विद्यार्थी त्यांना हिंदीत बोलण्याचा आग्रह करत होते. मात्र, अभिजीत दिपके हे मनोज जरांगे मराठीत काय बोलतात, त्याचे भाषांतर करुन विद्यार्थ्यांना सांगत होते. तरीही काही विद्यार्थी मनोज जरांगे यांना हिंदीत बोलायचा आग्रह करत होते. यावर मनोज जरांगे यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत मिश्कील टिप्पणी केली. काय वेळ आलेय, मी मराठीत बोलतोय आणि हे हिंदीत सांगायले. मला हिंदी येत नाही, तोच प्रॉब्लेम आहे. पण मी हिंदी बोललो तर तुम्ही तुमचं हिंदी विसरुन जाल, असे जरांगे यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

यावेळी मनोज जरांगे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून मी इथे आलो आहे. भाजप सरकार प्रत्येकवेळी गोरगरीब लोकांच्या लेकरांवर अन्याय करते. या पुढच्या काळात सरकारने विद्यार्थ्यांवर हात उचलला तर प्रयत्न यांचं महारष्ट्रातील फिरण पूर्ण बंद होणार आणि यांचा माज पूर्ण उतरवल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.



### 'अहंकारी सरकारचा अंत जवळ आलाय!'

मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता आणि दिग्दर्शक हेमंत ढोमे कायम आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या विषयांवर व्यक्त होताना दिसतो. नीट पेपरफुटीनंतर कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलकांसह, विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या लाठीमारामुळे संपूर्ण देशातून युवकांचा रोष व्यक्त होतोय. दरम्यान, विरोधी पक्षांच्या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानाबाहेर केलेल्या ठिय्या आंदोलनानंतर विरोधी पक्षातील खासदार राहुल गांधी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह अनेक विरोधी पक्ष नेत्यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं. पोलिसांच्या या कारवाईनंतर मनोरंजन सृष्टीतूनही अनेक कलाकारांकडून प्रतिक्रिया उमटल्या. यावर मराठी अभिनेता हेमंत ढोमेची प्रतिक्रिया सध्या चर्चेत आहे.सोशल मीडियावर राहुल गांधींना उचलून नेणाऱ्या पोलिसांचा फोटो ठेवत त्यांनी सरकारवर टीका केलीय. कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला आणि एकूणच तरुणांच्या शिक्षण व्यवस्थेविषयीच्या प्रश्नावर याआधीही अभिनेता हेमंत ढोमे व्यक्त झाला आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानाबाहेर घोषणाबाजी करणाऱ्या विरोधी पक्षातील खासदारांवर कारवाई करण्यात आल्यानंतर हेमंत ढोमे ने instagram वर स्टोरी पोस्ट करत सरकारवर टीका केली आहे. तो म्हणाला ' भारताचा विरोधी पक्षनेता असा उचलून नेणाऱ्या अहंकारी सरकारचा अंत आता जवळ आला आहे! आता तरुण पोरं तुम्हाला उचलून फेकणार हे नक्की!' असं तो या पोस्टवर म्हणालाय.

आम्ही देखील आंतरवाली सराटीला आंदोलन केले होते. तिकडेही गोरगरीबांच्या लेकरांवर, मायमाऊली, मुलींना आणि वृद्ध माणसांवर पोलिसांनी प्राणघातक हल्ला केला होता. आमच्यावर गोळ्या घातल्या होत्या. माझी विद्यार्थ्यांना एकच विनंती, तुम्ही फक्त ही जागा सोडू नका. आम्ही सगळा देश तुमच्यामागे आहे, तुम्ही दुसरीकडे गेलात तर आंदोलन मोडून टाकतील. हे सरकार आपण निवडून दिले आहे. हेच आज आपल्या लेकराबाळांवर उलटलेत, त्यांना उलटं करायची ताकद विद्यार्थ्यांमध्ये आणि गोरगरीब जनतेमध्ये आहे, हे त्यांच्या ध्यानात नाही, असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

राजधानी दिल्लीत NEET पेपरफुटी प्रकरण, शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी आणि 'कॉकरोच जनता पार्टी'चे आंदोलन यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे. पंजाब व हरियाणातील शेतकऱ्यांनी शंभू बॉर्डरच्या दिशेने कूच केली असून, जंतर-मंतरवरही मोठे आंदोलन सुरू आहे. नुकत्याच झालेल्या विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्यानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.सुरक्षेचा उपाय म्हणून आता सीआरपीएफच्या 20 तुकड्या विमानाने पश्चिम बंगालमधून तातडीने दिल्लीत बोलावण्यात आल्या आहेत.

विरोधकांनी या आंदोलनाला पाठिंबा देत सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. शरद पवार, सुप्रिया सुळे, अरविंद केजरीवाल आणि उद्धव ठाकरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला आहे.तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी थेट पंतप्रधान निवासाबाहेर ठिय्या आंदोलन केले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी दिल्लीत 16 मेट्रो स्टेशन बंद करण्यात आली आहेत.

वाढता तणाव, पोलिसांवर झालेले हल्ले आणि संसदेचे सुरू असलेले पावसाळी अधिवेशन लक्षात घेता, गृह मंत्रालयाने सुरक्षेसाठी अत्यंत मोठे पाऊल उचलले आहे.सीआरपीएफच्या 20 तुकड्या पश्चिम बंगालमधून तातडीने दिल्लीत बोलावण्यात आल्या आहेत. आंदोलनाला हिंसक वळण लागण्याची शक्यता असल्याने संपूर्ण दिल्लीला सध्या छावणीचे स्वरूप आले असून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. एका कंपनीत सुमारे 100 जवान असतात. त्यामुळे कोलकाता येथून जवळपास 2000 अतिरिक्त जवान दिल्लीत दाखल होत आहेत. दिल्ली पोलिसांच्या मदतीसाठी केंद्र सरकारने आधीच सीआरपीएफ आणि दंगल नियंत्रण पथकाच्या (RAF) 30 कंपन्या तैनात केल्या आहेत.










## थोडक्यात पण महत्वाचे



## डाबर रुमाटिलतर्फे पंढरपूर वारीतील वारकऱ्यांसाठी आरोग्यसेवेचा उपक्रम


पुणे (आरंभ पर्व) : जगातील आघाडीची आयुर्वेदिक उत्पादने उत्पादक कंपनी डाबर इंडिया लिमिटेड यांनी पंढरपूरच्या पवित्र वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मार्गातील विविध ठिकाणी विशेष आयुर्वेदिक आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिरांमध्ये आरोग्य तपासणी तसेच डाबर रुमाटिल तेलाद्वारे आयुर्वेदिक पाय व पाठीचा मसाज अशा सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत तज्ज्ञ आरोग्यसेवक या शिबिरांमध्ये कार्यरत असून, लाखो वारकऱ्यांना उपचारात्मक, प्रतिबंधात्मक आणि आरोग्यवर्धक सेवा पुरविण्यात येत आहेत. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धार्मिक परंपरांपैकी एक असलेली आषाढी एकादशी वारी सोलापूर जिल्ह्यातील चंद्रभागा नदीच्या तीरावर वसलेल्या पंढरपूर येथे येऊन समाप्त होते. भगवान विठोबाचे प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूरमध्ये दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. डाबर इंडिया लिमिटेडचे एथिकल मार्केटिंग प्रमुख डॉ. दुर्गा प्रसाद म्हणाले, "१४५ वर्षांहून अधिक समृद्ध परंपरा लाभलेल्या डाबरसाठी देशभरातून येणाऱ्या ५० लाखांहून अधिक वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांच्या वारीला हातभार लावणे ही अभिमानाची बाब आहे. प्रत्येक कुटुंबाच्या आरोग्य आणि कल्याणासाठी समर्पित राहण्याच्या आमच्या ध्येयाशी हा उपक्रम सुसंगत आहे. या सामाजिक कार्याचा भाग होताना आम्हाला आनंद होत असून, या उपक्रमाद्वारे वारकऱ्यांना सुरक्षित प्रवास आणि प्रभावी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे."



## 'एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअर' सुरू

पुणे (आरंभ पर्व) : वेगाने वाढणारा भारतीय किचन आणि बाथरूम फिटिंग्ज ब्रँड 'रुहे' (Ruhe) ने आज पुण्यात आपल्या 'एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअर'चे — 'चामुंडा किट-बाथ स्टुडिओ'चे — उद्घाटन जाहीर केले. हे स्टोअर आदर्श नगर, बीआरटी रोड, कालेवाडी, पिंपरी-चिंचवड येथे स्थित असून, सोमवार, २० जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून ग्राहकांसाठी खुले होत आहे. भारतातील ब्रँडच्या ऑफलाइन रिटेल विस्तारातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. उद्घाटन समारंभात फीत कापण्याचा कार्यक्रम, स्टोअरची पाहणी आणि अधिकृत डीलरशिप प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. त्यानंतर पुणे परिसरातील इन्फ्लुएन्सर्स, वास्तुविशारद, इंटिरिअर डिझाइनर्स आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत संवाद व नेटवर्किंग सत्रे आयोजित करण्यात आली. या प्रसंगी बोलताना 'रुहे'चे संस्थापक श्री. कपिल गुप्ता म्हणाले: "हे केवळ एक नवीन स्टोअर नाही, तर 'रुहे'च्या 'क्विक-कॉमर्स रिटेल मॉडेल'चे हे पहिले पाऊल आहे. 'चामुंडा किट-बाथ स्टुडिओ' हे 'रुहे'चे 'डिस्प्ले स्टोअर' म्हणून काम करेल. येथे आमचे डीलर भागीदार केवळ मर्यादित साठा (इन्व्हेंटरी) ठेवतील, तर ग्राहकांची मागणी थेट भिवंडी (मुंबई) आणि अहमदाबाद येथील आमच्या गोदामांमधून (वेअरहाऊस) पूर्ण केली जाईल. पुणे हे या दोन केंद्रांच्या मध्ये मोक्याच्या ठिकाणी असल्याने, या मॉडेलची सुरुवात करण्यासाठी हे शहर अत्यंत योग्य आहे. यामुळे आमच्या डीलर्सना मोठ्या प्रमाणात साठा करून ठेवण्याच्या ओझ्यापासून मुक्ती मिळते, ग्राहकांना नेहमीच कारखान्यातून थेट आलेला ताजा माल मिळतो आणि स्टोअरला त्यांच्या मुख्य कामावर — म्हणजेच लोकांना आमच्या उत्पादनांचा अनुभव घेण्यास मदत करण्यावर — लक्ष केंद्रित करता येते. पिंपरी-चिंचवडमध्ये रिटेलची ही नवीन पद्धत आणताना श्री. सुनील शिंदे यांच्यासोबत भागीदारी करताना आम्हाला खूप आनंद होत आहे."

## नाणेघाट परिसरात फिरायला जाणं बेतलं जीवावर; खोल दरीत पडून मृत्यू



जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर व मुरबाड तालुक्याच्या सीमेवर असलेल्या ऐतिहासिक नाणेघाट येथील 'नानाचा अंगठा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंगरावर गेलेल्या चार मित्रांपैकी एकाचा डोंगरकड्यावरून पाय घसरून दरीत पडून मृत्यू झाल्याची घटना (दि २० जुलै रोजी) घडली. दत्ता विनायक लोंढे (वय २२) रा. -पारगाव ता. आंबेगाव, जि. पुणे असे दरीत पडून मृत्यू झालेल्या युवकाचे नाव असून त्याचा मृतदेह (दि २१ रोजी) शोधून काढण्यात मुरबाड येथील सह्यागिरी रेस्क्यू टीमला यश आले आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजस लक्ष्मण काटे (वय २५), सुनील बाबुराव पवार (वय २३), अनिकेत संदीप ढोबळे (वय २२), दत्ता विनायक लोंढे (वय २२ सर्व रा. -पारगाव ता. आंबेगाव, जि. पुणे हे नाणेघाट परिसरातील नानाचा अंगठा या ठिकाणी फिरण्यासाठी गेले होते. त्यांचे अगोदर अर्धवट वाटेतून परत जातो म्हणून निघालेला दत्ता लोंढे हा पार्किंगच्या ठिकाणी गाडीमध्ये मिळून आला नाही म्हणून त्याच्या सोबतच्या मित्रांनी इतर स्थानिकांसह शोध घेतला असता तो जवळपास कोठेही दिसून आला नाही. सदर घटनेची माहिती मिळताच तात्काळ जुन्नर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत चौधरी व पथक रवाना करून आपदा विभागातील रेस्क्यू टीम, फॉरेस्ट विभाग यांना माहिती देऊन सदर ठिकाणी शोध व बचाव कार्य सुरू केले असता दाट धुक्यामुळे दरीमध्ये काहीही दिसून येत नसल्याने शोधण्यात अडचण निर्माण झाली. सदर युवकाची डोंगरावर अर्धवट ठिकाणी एक चप्पल मिळून आल्याने तसेच दरीत घसरल्याच्या खुणा दिसल्याने सदर युवक पावसामध्ये पाय घसरून दरीत पडला असण्याची दाट शक्यता वाटली. घटनास्थळी आपदा मित्र सुशांत भुजबळ रेस्क्यू टीम सदस्य आदित्य डेरे, शंतनू डेरे जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, वनपरिक्षेत्राधिकारी प्रदीप चव्हाण यांनी थर्मल ड्रोन द्वारे या ठिकाणी पाहणी केली असता पाऊस वारा व धुके यांचा अंदाज न आल्याने शोध मोहीम थांबवली होती.

# समाविष्ट गावातील मनपा शाळा नऱ्हेची भरारी

## शिक्षण आयुक्तांकडून उपक्रमांचे कौतुक



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

समाविष्ट गावातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा, क्रीडा, योग, डिजिटल शिक्षण आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या बळावर उल्लेखनीय प्रगती करणाऱ्या पुणे महानगरपालिका शाळा नऱ्हेला महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांनी भेट देऊन शाळेच्या कार्याचे कौतुक केले. समाविष्ट गावातील अनेक अडचणींवर मात करत शाळेने केलेली प्रगती आणि शैक्षणिक गुणवत्ता पाहून त्यांनी शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले.

सलग तिसऱ्या वर्षी प्रवेश हाऊसफुल झालेल्या या शाळेत यंदा सुमारे ९०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. खासगी शाळांना पर्याय म्हणून पालकांचा मनपा शाळेकडे वाढलेला विश्वास ही शाळेची मोठी जमेची बाजू ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. भेटीदरम्यान शिक्षण आयुक्तांनी वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. स्वतः शिक्षकाची भूमिका स्वीकारत त्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेचा तास घेतला. विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, करिअरच्या विविध संधी, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगत जिज्ञासू वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षा, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठीची एनएमएमएस, ऑलिंपियाड व एलिमेंट्री परीक्षा तयारी, निपुण महाराष्ट्र अभियान, कॉग्निझंट आयटी कंपनीच्या सीएसआर अंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम, स्मार्ट क्लासरूम, विद्यार्थी स्मार्ट उपस्थिती प्रणाली, योग प्रशिक्षण, विविध क्रीडा स्पर्धा तसेच स्वच्छ व सुंदर शाळा उपक्रमांची त्यांनी सविस्तर पाहणी केली. शाळेतील डिजिटल शिक्षण व्यवस्था, शिस्तबद्ध वातावरण आणि स्वच्छ परिसराची त्यांनी प्रशंसा केली. शिष्यवृत्ती, एनएमएमएस, योग, सूर्यनमस्कार व विविध क्रीडा स्पर्धांमधील विद्यार्थ्यांच्या यशाची माहितीही त्यांनी जाणून घेतली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभारी मुख्याध्यापक अंकुश माने व शिक्षकवृंद सातत्याने घेत असलेल्या परिश्रमांचे शिक्षण आयुक्तांनी विशेष कौतुक केले. भविष्यात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणासाठी अधिक सक्षम करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू ठेवावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे, शिक्षण आयुक्तालयाचे अधीक्षक दिगंबर मोरे, नगरसेविका कोमल नवले, सागर भूमकर, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी सुरेश उचाळे तसेच पर्यवेक्षक नंदा डोळस उपस्थित होते.

## 'अगं आई अहो आई'मधून उलगडणार कौटुंबिक नात्यांची हळवी वीण



**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

Zee5 मराठीने 'अगं आई अहो आई' या आपल्या आगामी ओरिजिनल सीरिजचा अधिकृत ट्रेलर प्रदर्शित केला आहे. हृता दुर्गुळे, रेणुका शहाणे आणि निर्मिती सावंत यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सीरिजमध्ये कुटुंब, नाती आणि मायेचा सुंदर प्रवास उलगडून दाखविण्यात आला आहे. वरुण नार्वेकर यांनी या सीरिजचे दिग्दर्शन केले असून, कल्याणी पंडित यांनी लेखन केले आहे. जिओ स्टुडिओज, बहावा एंटरटेन्मेंट आणि प्रतिसाद प्रॉडक्शन्स यांनी या सीरिजची निर्मिती केली आहे. मुलगी, तिची आई आणि सासू यांच्यातील हळुवार आणि क्वचितच पडद्यावर पाहायला मिळणाऱ्या नात्याचा वेगळा पैलू या सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे. प्रेमाने आणि आपुलकीने कुटुंब अधिक घट्ट जोडले जाते, हाच संदेश ही सीरिज देते. 'अगं आई अहो आई'चा प्रीमियर 24 जुलै 2026 रोजी केवळ Zee5 मराठीवर होणार आहे. 'अगं आई अहो आई' ही नाती, स्वीकार आणि माणसांच्या परस्परांशी असलेल्या बंधांची गोष्ट आहे.

# पालिकेच्या सभागृहात सुभाष नाणेकर आक्रमक

### समाविष्ट गावांकरिता विशेष सभा बोलवा, अन्यथा टॅक्स माफ करा : नगरसेवक सुभाष नाणेकर

## पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांच्या पेन्शनसह समाविष्ट गावांच्या करप्रश्नी आवाज



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहात झालेल्या बैठकीत नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा प्रश्न आणि नव्याने समाविष्ट झालेल्या १० गावांतील नागरिकांवरील मालमत्ता कराचा मुद्दा अत्यंत आक्रमकपणे मांडला.

नाणेकर म्हणाले की, ४० वर्षांहून अधिक सेवा करूनही अनेक पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना आजतागायत पेन्शन मिळालेली नाही. मुंबई उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिल्यानंतरही प्रशासनाकडून ठोस अंमलबजावणी होत नसल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे.

महापालिकेने आवश्यक निधी उपलब्ध करून कर्मचाऱ्यांना तातडीने पेन्शन द्यावी, अशी त्यांनी मागणी केली.

याचवेळी समाविष्ट गावांच्या मालमत्ता कराचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी सांगितले की, रस्ते, पाणी, ड्रेनेज, आरोग्य, शिक्षण अशा मूलभूत सुविधा पूर्णपणे उपलब्ध नसताना नागरिकांकडून कर वसूल करणे योग्य नाही. त्यामुळे या विषयावर विशेष सभा बोलवून निर्णय घ्यावा; अन्यथा समाविष्ट गावांतील नागरिकांचा मालमत्ता कर माफ करावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

तसेच पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना केवळ कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्ष वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, रुग्णालयांचे थकीत देयक तातडीने अदा करावे आणि कर्मचाऱ्यांना सन्मानाने जगता येईल, अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी त्यांनी सभागृहात केली. लोकहिताच्या या दोन्ही प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशाराही नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी दिला.

# वाहनाला अडवून लुटण्याचा प्रयत्न

## खासगी गाडी ठरविली, त्यांनीच रचला कट, तिघांना अटक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बँकेत पैसे भरण्यासाठी खासगी गाडी ठरविली, त्यांना गाडीत १ कोटी रुपये असल्याची माहिती मिळाल्यावर त्यांनी कट रचून पोलीस असल्याची बतावणी करुन ही रक्कम चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. नऱ्हे पोलिसांनी दरोड्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करुन तिघांना अटक केली आहे. विक्रम विलास चाकणकर (वय ४४), अमेय अरविंद कार्ले (वय ४६), गणेश रमेश कदम (वय ३३, सर्व रा. धायरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांचे दोन साथीदार फरार आहेत. याबाबत हर्षवर्धन भूषण पवार (वय ३५, रा. कृष्णकृपा अपार्टमेंट, तपोधाम कॉलनी, तळेगाव दाभाडे) यांनी नऱ्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना सिंहगड रोडवरील ब्रम्हा हॉटेल ते खेड शिवापूर पोलीस चौकी दरम्यान १८ जुलै २०२६ रोजी दुपारी एक ते दोन दरम्यान घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा स्टेशनरीचा व्यवसाय आहे. ते संपूर्ण पुणे शहराला स्टेशनरीचा पुरवठा करतात. त्यांच्याकडे जमा झालेली १ कोटी रुपयांची रक्कम बँकेत भरण्यासाठी त्यांनी खासगी सॅन्ट्रो कार भाड्याने घेतली होती. हे पैसे बँक भरुन ते त्यांच्या ट्रस्टमध्ये ट्रान्सफर करायचे होते. हर्षवर्धन पवार व त्यांचे सहकारी किरण आपटे हे नोटांनी भरलेल्या दोन बॅगा घेऊन कारमध्ये बसले. ते नेहमी ही गाडी भाड्याने घेत असत. त्यामुळे ते ओळखीचे होते. विक्रम चाकणकर हा गाडी चालवत होता. नऱ्हे येथील एचडीएफसी बँकेत जात असताना वाटेत मोटारसायकलवरुन चौघे जण आले.

त्यांनी गाडी थांबवली. अमेय कार्ले हा हर्षवर्धन पवार यांच्याजवळ येऊन म्हणाला की "आम्ही पोलीस आहोत, तुम्ही दोन नंबरचा माल घेऊन चाललेला आहात, हे आम्हाला माहित आहे. एवढी रक्कम घेऊन कोठे चाललो आहात. गाडी बाजूला घ्या' असे सांगितले. तेव्हा पवार व त्यांचे सहकारी किरण आपटे घाबरले. याचा फायदा घेऊन गाडीचा दरवाजा उघडून अमेश कार्ले व गणेश कदम हे गाडीत बसले. त्यांनी दोन्ही बॅगा खेचण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत विक्रम चाकणकर याने गाडी सुरु करुन सातारा रोडकडे घेतली.

गाडीत त्यांची बोलाचाली झाली. त्यानंतर विक्रम चाकणकर याने कार थेट खेड शिवापूर पोलीस चौकीत नेली. पोलिसांनी चौकशी केली असता हा प्रकार नऱ्हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याचे समजल्यावर त्यांनी नऱ्हे पोलिसांना कळविले. नऱ्हे पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यात हे तिघे व त्यांचे २ साथीदार यांनी मिळून हा पैसा लुटण्याचा कट रचला असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दरोड्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करुन तिघांना अटक केली आहे. पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे तपास करीत आहेत.

## जुन्नरमध्ये तीन किलो गांजा जप्त; एकाला अटक

- साडेदहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत
- रात्रगस्ती दरम्यान पोलिसांची कारवाई

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर शहरातील बंद स्थितीतील अहिल्यादेवी होळकर शाळा क्रमांक ४ च्या परिसरात जुन्नर पोलिसांनी केलेल्या कारवाईत सुमारे ३.०२८ किलो गांजा, एक टोयोटा इनोव्हा कार आणि एक दुचाकी असा एकूण १० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी मयूर संजय खराडे याला अटक करण्यात आली असून अन्य दोन आरोपी फरार आहेत. पोलिस हवालदार रमेश हांडे, पोलिस शिपाई बापू वाघमोडे आणि अमोल सातपुते हे १९ जुलै रोजी रात्री नियमित गस्त करत असताना त्यांना शाळा परिसरात एक चारचाकी आणि एक दुचाकी संशयास्पदरीत्या उभी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याच दोन वाहनांतून पोलिसांनी गांजा जप्त केला. याबाबत वरिष्ठांना कळविण्यात आलेनंतर पोलिस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांना माहिती दिल्यानंतर त्यांच्या आदेशानुसार सहायक पोलिस निरीक्षक संदीप मोरे, पोलिस हवालदार महेश भालेराव तसेच पोलिस शिपाई दादा पावडे, कैलास केंद्रे, शंभू निरडे आणि अजय इंगोले यांचे पथक घटनास्थळी खाना झाले.

# आषाढी वारीच्या पूर्वसंध्येला येरवडा खुले कारागृहात अवतरला पांडुरंग

## कारागृहाच्या प्रांगणात रंगला भक्तीचा मळा; बंदी वारकऱ्यांनी धरले पारंपरिक रिंगण

- डॉ. सदानंद मोरे यांच्या प्रवचनाने बंदी बांधव मंत्रमुग्ध
- टाळ-मृदंगाच्या गजरात बंदी वारकऱ्यांचे रिंगण
- संत तुकाराम महाराजांची 'गाथा' देऊन अधिकाऱ्यांचा सन्मान



या कार्यक्रमाला कारागृहातील शिक्षाबंदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखेरीस 'पसायदान' आणि 'राम कृष्ण हरी'च्या जयघोषात या भक्तिमय सोहळ्याची सांगता झाली. आषाढी वारीच्या पूर्वसंध्येला कारागृहाच्या प्रांगणात रंगलेला हा भक्तीचा मळा आणि बंदी वारकऱ्यांनी धरलेले रिंगण उपस्थितांच्या कायम स्मरणात राहणारे ठरले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"टाळी वाजवावी गळा, वारी पाहावी पाऊली..." या संतवचनाची प्रचिती येरवडा खुले कारागृहात आली. आषाढी वारीच्या पूर्वसंध्येला टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठल नामाचा जयघोष, हरिपाठ आणि संतविचारांनी संपूर्ण कारागृह परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. विशेष म्हणजे बंदी बांधवांनी कारागृहाच्या प्रांगणात पारंपरिक रिंगण धरत फुगड्या आणि विविध खेळांमध्ये सहभाग घेतला. त्यामुळे काही काळासाठी येरवडा खुले कारागृहालाच जणू पंढरीच्या वारीचे स्वरूप प्राप्त झाले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचालित जगतगुरू संत तुकाराम महाराज संतपीठाचा वर्धापन दिन आणि आषाढी वारीचा पवित्र काळ यांचे औचित्य साधून कारागृहातील बंदी बांधवांसाठी विशेष 'प्रवचन व हरिपाठ सेवा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि पुणे विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण जगतसदगुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे थेट वंशज, ज्येष्ठ विचारवंत, इतिहास संशोधक तसेच ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ह. भ. प. डॉ. सदानंद मोरे महाराज यांचे प्रवचन ठरले.

'तुकाराम दर्शन' आणि 'उजळल्या दिशा' यांसारख्या ग्रंथांचे लेखक असलेल्या डॉ. सदानंद मोरे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीत संत तुकाराम महाराजांचे विचार, संतपरंपरा आणि मानवी जीवनातील संतविचारांचे महत्त्व उलगडून सांगितले. त्यांच्या प्रवचनातून वाहिलेल्या संतविचारांच्या प्रवाहात उपस्थित बंदी बांधव आणि श्रोते मंत्रमुग्ध झाले. प्रवचनानंतर झालेल्या हरिपाठ सेवेमुळे संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय झाले. टाळ-मृदंगाचा गजर आणि 'विठ्ठल-विठ्ठल', 'राम कृष्ण हरी'च्या जयघोषाने कारागृह परिसर दुमदुमून गेला. टाळ-मृदंगाचा वेग वाढताच बंदी वारकऱ्यांनी कारागृहाच्या प्रांगणात पारंपरिक रिंगण धरले. भक्तिरसात तल्लीन झालेल्या बंदी बांधवांनी फुगड्या, उड्या आणि पारंपरिक खेळांमध्ये सहभाग घेत आनंद व्यक्त केला. काही काळासाठी कारागृहाच्या भिंतींच्या आतही पंढरीच्या वारीचा उत्साह अनुभवायला मिळाला. बंदी बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग उपस्थितांसाठीही भावनिक आणि अविस्मरणीय अनुभव ठरला.

या सोहळ्याला संतपीठाच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक अभय टिळक, ह. भ. प. राजू महाराज ढोरे, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याध्यापिका स्नेहल पगार, समन्वयिका मयुरी मुळूक, माहेर फाउंडेशनच्या विद्या म्हात्रे, कार्यक्रमाचे मुख्य आयोजक तथा येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे तसेच मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण वर्गाचा अध्यापक वर्ग उपस्थित होता. या प्रसंगी संतपीठाच्या वतीने येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे आणि इतर अधिकाऱ्यांचा 'जगतसदगुरू संत तुकाराम महाराज गाथा' आणि शाल प्रदान करून सन्मान करण्यात आला.

येरवडा कारागृह प्रशासन आणि संतपीठ, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून बंदी बांधवांच्या मानसिक आणि वैचारिक परिवर्तनासाठी संतविचारांची जोड देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अभिनव उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, निशा श्रेयकर, सुभेदार सुनील गायकवाड, बालाजी सावंत, हवालदार राजेंद्र धनगर, वैशाली थोरात, महिला कारागृह शिपाई मोनिका लांडगे, संध्या जाधवर, ऐश्वर्या मुळे, कारागृह शिपाई याकुब शेख, विजयकुमार दिवेकर, राकेश पवार, वैभव पाटील, मोहसिन जमादार, महेंद्र लोहकरे, गोविंद गावडे, वरिष्ठ लिपिक, कृषी सहाय्यक भांगे यांच्यासह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. २२ जुलै २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे

### मोबएवेन्यू एआयची नवी ब्रँड ओळख




मुंबई (आरंभ पर्व) : जाहिरात, विपणन आणि ग्राहकवृद्धी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या मोबएवेन्यू एआय टेक लिमिटेडने आपल्या नव्या ब्रँड ओळखीचे अनावरण करत 'मोबएवेन्यू न्यूरल इंजिन' या अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचे सादरीकरण केले आहे. जाहिरात नियोजन, मोहिमांचे व्यवस्थापन आणि परिणामांचे विश्लेषण अधिक वेगवान, अचूक आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, ही नवी ब्रँड ओळख केवळ लोगो किंवा दृश्यात्मक बदल नसून गेल्या काही वर्षांत झालेल्या संस्थात्मक परिवर्तनाचे प्रतीक आहे. मुंबईतील छोट्या बूटस्ट्रॅप स्टार्टअपपासून शेअर बाजारात सूचीबद्ध झालेल्या जागतिक जाहिरात तंत्रज्ञान कंपनीपर्यंतचा प्रवास या नव्या ओळखीतून अधोरेखित करण्यात आला आहे. मोबएवेन्यूची सुरुवात २०१७ मध्ये अभियांत्रिकीचे विद्यार्थी तेजस राठोड आणि कुणाल कोठारी यांनी डिजिटल जाहिरातींवरील प्रयोगातून केली. नंतर ईशांक जोशी सह-संस्थापक म्हणून सहभागी झाल्यानंतर कंपनीने सेवा-आधारित मॉडेलमधून स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला. आज कंपनीचे २०० हून अधिक कर्मचारी, १० पेक्षा अधिक देशांतील बाजारपेठांमध्ये कार्यरत असून १५० हून अधिक ब्रँड्सना सेवा देत आहेत.

### अखिल शिक्षक संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी निवेदन



जुन्नर (आरंभ पर्व) : अखिल पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे वतीने पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांचो भेट घेऊन शिक्षक बांधवांच्या विविध प्रश्नांकडे लेखी निवेदन देऊन लक्ष वेधले. यावेळी शिक्षणाधिकारी पदी नियुक्त झालेल्या ललिता दहीतुले यांचे संघटनेच्या वतीने प्रथम सत्कार व स्वागत करण्यात आले तसेच जिल्ह्यात सुरू असणारे विविध उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता आणि भविष्यात आपल्या माध्यमातून पुणे जिल्हा राज्यात अग्रेसर राहण्याकरिता शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने काम करावे व याबाबत आमची संघटना आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असून, जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्न आपल्या माध्यमातून सोडवण्यासाठी प्रयत्न व्हावेत याकरिता आपण आग्रही रहावे व पुणे जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या प्रश्नाबाबतचे प्राथमिक स्वरूपात निवेदन श्री. सुभाष मोहरे जिल्हाध्यक्ष यांनी सादर केले. तदनंतर शिक्षण विभाग प्राथमिक अधिक्षक पदाचा पदभार स्वीकारलेले दत्तात्रय भारमळ यांचा सत्कार व त्यांना पुढील कार्यास संघटनेच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

### एम.एस. धोनीची सोलरस्क्वेअरमध्ये गुंतवणूक; विस्ताराला नवी चालना



पुणे (आरंभ पर्व) : भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी याने निवासी छतावरील सौरऊर्जा क्षेत्रातील आघाडीची कंपनी सोलरस्क्वेअरमध्ये गुंतवणूक करत भारतातील स्वच्छ ऊर्जा अभियानाला बळ दिले आहे. धोनीने आपल्या 'मिडास डील्स' या कौटुंबिक गुंतवणूक संस्थेमार्फत कंपनीत भांडवल गुंतवले असून, तो आता कंपनीचा ब्रँड दूत म्हणूनही कार्य करणार आहे. ही गुंतवणूक कंपनीच्या नुकत्याच पूर्ण झालेल्या ५३ दशलक्ष डॉलरच्या 'सीरिज सी' निधी उभारणीचा भाग आहे. भारतामध्ये निवासी छतावरील सौरऊर्जा क्षेत्र वेगाने विस्तारत असून, वाढते वीजदर, स्वच्छ ऊर्जेची वाढती गरज आणि दीर्घकालीन बचतीच्या दृष्टीने ग्राहकांचा कल या क्षेत्राकडे वाढत आहे. या पार्श्वभूमीवर धोनीची गुंतवणूक निवासी सौरऊर्जा बाजारपेठेच्या भविष्यातील वाढीवर असलेला त्याचा विश्वास अधोरेखित करते. सध्या सोलरस्क्वेअर देशातील २९ शहरांमध्ये ५० हजारांहून अधिक घरांना सेवा पुरवत आहे.

# विरोधाचाही सन्मान करणारे, आपुलकी जपणारे नेतृत्व

## मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस

**राजकारणात विचारांची लढाई असते, भूमिका वेगळ्या असतात, मतभेद असतात आणि प्रसंगी तीव्र संघर्षही होतो. मात्र या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन विरोधी विचारांचा सन्मान करणे, आंदोलकांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि व्यक्तिगत नात्यांमध्ये आपुलकी कायम ठेवणे, ही एका प्रगल्भ नेतृत्वाची ओळख असते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या व्यक्तिमत्त्वातील हीच बाब मला नेहमीच विशेष भावली आहे.**



: शब्दांकन :
**मा. सौ. तृप्तीताई देसाई**
संस्थापक अध्यक्ष, भूमाता ब्रिगेड / भूमाता फाउंडेशन

**(दै. आरंभ पर्व)**

माझ्या सामाजिक आणि आंदोलनात्मक जीवनातील सर्वात मोठी आंदोलने देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतानाच झाली. एक आंदोलक म्हणून मी अनेकदा तत्कालीन सत्ताधाऱ्यांच्या विरोधात रस्त्यावर उतरले. सरकारच्या अनेक निर्णयांविरोधात भूमिका घेतली. प्रसंगी थेट मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणीही केली. आमच्यात वैचारिक मतभेद होते आणि आजही अनेक विषयांवर भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र या विरोधाकडे त्यांनी कधीही व्यक्तिगत आकसाने पाहिले नाही.

**विरोधामध्येही कायम राहिला सन्मान :** राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात अनेकदा विरोध म्हणजे वैर, अशी परिस्थिती निर्माण होताना आपण पाहतो. टीका केली की संबंध बिघडतात, आंदोलन केले की व्यक्तिगत कटुता निर्माण होते. परंतु देवेंद्रजींच्या बाबतीत मला वेगळा अनुभव आला.मी अनेकदा त्यांच्या सरकारविरोधात आंदोलन केले, कठोर शब्दांत भूमिका मांडली; तरीही प्रत्यक्ष भेट झाल्यानंतर त्यांच्या वागण्यात कधीही सुडाची किंवा बदल्याची भावना जाणवली नाही. उलट, प्रत्येक भेटीत त्यांनी अत्यंत आपुलकीने विचारपूस केली. विरोधी भूमिका मांडणाऱ्या व्यक्तीलाही सन्मान देण्याची ही वृत्ती त्यांच्या राजकीय संस्कारांची ओळख आहे. विरोधकांचा आणि आंदोलकांचा सन्मान कसा करावा, हे देवेंद्रजींकडून शिकण्यासारखे आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधक या दोघांचीही भूमिका महत्त्वाची आहे. आपल्यावर टीका करणाऱ्यांचेही म्हणणे ऐकण्याची तयारी नेतृत्वाकडे असली पाहिजे. देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्त्वात मला ही बाब नेहमीच दिसली.



**महिलांच्या समान संधींसाठी सकारात्मक दृष्टिकोन :** स्त्रीशक्तीचा आदर आणि महिलांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात समान संधी मिळायला हवी, हा आधुनिक आणि पुरोगामी विचार देवेंद्रजींच्या भूमिकेतून सातत्याने जाणवतो. महिला केवळ सहभागी न राहता निर्णयप्रक्रियेतही सक्षमपणे पुढे यायला हव्यात, त्यांना सन्मानाचे आणि समानतेचे स्थान मिळायला हवे, याबाबत त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक राहिला आहे.

महिलांच्या प्रश्नांवर आंदोलन करताना आम्ही अनेकदा सरकारसमोर कठोर भूमिका घेतली. मात्र त्या भूमिकेमागील प्रश्न समजून घेण्याची आणि निवेदन स्वीकारून चर्चा करण्याची तयारी त्यांनी दाखवली. लोकशाहीतील संवादाचे महत्त्व जपणाऱ्या नेतृत्वाचे हे वैशिष्ट्य मला नेहमीच महत्त्वाचे वाटते.



**"काय तृप्तीताई, सध्या तुम्ही शांत का आहात?" :** देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक बाजू म्हणजे त्यांचा मिश्किल आणि आपुलकीचा स्वभाव. यासंदर्भातील एक आठवण आजही मनात कायम आहे.

एखाद्या कार्यक्रमात माझी भेट झाली आणि मी शांत दिसले की ते हसतमुखाने मिश्किलपणे विचारायचे, "काय तृप्तीताई, सध्या तुम्ही शांत का आहात?"

एका आंदोलक महिलेला मुख्यमंत्री इतक्या सहजपणे आणि आपुलकीने विचारतात, यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठेपणा दिसतो. मतभेद कितीही असले तरी व्यक्तिगत संबंधांमध्ये कटुता येऊ न देण्याची ही वृत्ती सार्वजनिक जीवनात अत्यंत महत्त्वाची आहे.

आम्ही जेव्हा जेव्हा विरोधी भूमिकेतून, एखाद्या आंदोलनाच्या निमित्ताने किंवा निवेदन घेऊन त्यांना भेटायला गेलो, तेव्हा प्रत्येक वेळी त्यांनी आम्हाला सन्मान दिला. आमचे म्हणणे ऐकून घेतले.



वैचारिक मतभेदांचा व्यक्तिगत संबंधांवर परिणाम होऊ दिला नाही. राजकारणात पदे येतात आणि जातात.

सत्ता बदलत राहते. मात्र एखाद्या नेत्याने आपल्या वागणुकीतून निर्माण केलेला विश्वास आणि माणुसकीची भावना दीर्घकाळ स्मरणात राहते.

देवेंद्रजींच्या नेतृत्वाचे मूल्यमापन करताना त्यांच्या प्रशासकीय आणि राजकीय कार्यासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही संवेदनशील बाजूही अधोरेखित करावी लागेल.

विरोधकांचा आवाज ऐकून घेणारे, आंदोलन करणाऱ्यांशी संवाद साधणारे, महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारे आणि राजकारणापलीकडे व्यक्तिगत नात्यांमध्ये आपुलकी जपणारे सुसंस्कृत, संवेदनशील आणि खंबीर नेतृत्व महाराष्ट्राला लाभले, याचा मला अभिमान वाटतो.

मतभेद असावेत, विचारांची लढाईही व्हावी; परंतु मनभेद होऊ नयेत, ही लोकशाहीची खरी ताकद आहे. देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्त्वात मला याच लोकशाही मूल्यांचा अनुभव अनेकदा आला आहे.

आज त्यांच्या वाढदिवसा निमित्त त्या सर्व आठवणींना उजाळा मिळत आहे.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात त्यांचे कार्य अधिक व्यापक व्हावे, त्यांच्या हातून जनतेची निरंतर सेवा घडावी आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांना आणखी बळ मिळावे, हीच सदिच्छा.

**लोकनेते देवेंद्रजी फडणवीस यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक आणि उत्तुंग शुभेच्छा! त्यांना उदंड, निरोगी आणि यशस्वी आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!**

# डिजिटल हजेरी प्रणालीचा यशस्वी प्रायोगिक शुभारंभ

## नगरसेविका कोमल सारंग नवले यांच्या पाठपुराव्याला यश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षण व्यवस्था अधिक आधुनिक, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी डिजिटल हजेरी प्रणाली सुरू करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. नगरसेविका कोमल सारंग नवले यांनी शिक्षण समिती सदस्य म्हणून केलेल्या पाठपुराव्यामुळे नऱ्हे येथील पुणे महानगरपालिकेच्या शाळेत या प्रणालीची प्रायोगिक चाचणी यशस्वीरीत्या पार पडली.



या उपक्रमाची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग यांनी शाळेला भेट देऊन डिजिटल हजेरी प्रणालीची कार्यपद्धती, विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्याची प्रक्रिया आणि तांत्रिक सुविधांची माहिती घेतली. या अभिनव उपक्रमाचे त्यांनी कौतुक करत भविष्यात ही प्रणाली अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना केल्या.

यावेळी शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे, अधीक्षक दिगंबर मोरे, नगरसेविका कोमल सारंग नवले, सामाजिक कार्यकर्ते सागर भूमकर, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी सुरेश उचाळे, पर्यवेक्षक नंदा डोळस तसेच शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

डिजिटल हजेरी प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची अचूक व तत्काळ नोंद होणार असून, गैरहजेरीवर नियंत्रण ठेवणे, पालक-शिक्षक-प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविणे आणि शाळांमधील प्रशासनिक कामकाज अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनविणे शक्य होणार आहे. याबाबत कोमल नवले यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास व्यक्त केला. प्रायोगिक चाचणी यशस्वी झाल्यानंतर ही प्रणाली टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेच्या इतर शाळांमध्येही लागू करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

# शालोपयोगी साहित्य व खाऊचे वाटप



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

कांदळी ता.जुन्नर गावचे राष्ट्रपती पुरस्कार विजेते माजी आदर्श सरपंच बाळासाहेब शिवाजीराव बढे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नगदवाडी ता.जुन्नर येथे सर्व विद्यार्थ्यांना शालोपयोगी शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नगदवाडी, न्यू इंग्लिश स्कूल नगदवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १४ नंबर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुतारठिके या शाळेतील सर्व ४०० विद्यार्थ्यांना दर्जेदार वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी बाळासाहेब बढे यांना शिरूर लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष वैभव काळे,कांदळी गावचे माजी उपसरपंच सुनील गुंजाळ,शांताराम घाडगे,नारायण भोर, मुरलीधर गुंजाळ,रघुनाथ बढे,महेश बढे यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कांदळी गावातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या नागरिकांना कान,नाक,घसा,डोळे,बीपी अथवा शुगरचे आजार असतील त्यांना तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चष्मा, श्रवणयंत्रासाठी किंवा शस्त्रक्रिया यासाठी आर्थिक मदत करणार असल्याचे माजी सरपंच बाळासाहेब बढे यांनी जाहीर केले. गरजू व्यक्तींनी किंवा नातेवाईकांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश मेहेर यांनी केले.सूत्रसंचालन डॉ.दीपक घाडगे,सुनील गुंजाळ,अक्षय बढे यांनी केले.आभार बाळासाहेब बढे यांनी मानले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### देशभरातील ३०,००० हून अधिक ईव्ही चार्जिंग पॉइंट्सची सुविधा

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल) ने आपल्या ईव्ही परिसंस्थेच्या प्रवासातील एका महत्त्वपूर्ण टप्प्याची घोषणा करत कंपनीने आपल्या मायह्युंदाई अॅपद्वारे देशभरातील ३०,००० हून अधिक ईव्ही चार्जिंग पॉइंट्सची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.हे एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेल्या सर्वात मोठ्या इंटिग्रेटेड चार्जिंग नेटवर्कपैकी एक आहे. ही सुविधा आघाडीच्या चार्ज पॉइंट ऑपरेटर्स आणि सेवा प्रदात्यांच्या भागीदारीत उभारण्यात आली आहे.

### ह्युंदाई इंडिया कुटुर वीक २०२६ च्या १९व्या पर्वाचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) ने फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (एफडीसीआय) च्या सहकार्याने ह्युंदाई इंडिया कुटुर वीक 2026 (एचआयसीडब्ल्यू) च्या 19 व्या पर्वाचे आयोजन केले आहे. भारताच्या प्रमुख फॅशन कार्यक्रमासाठी एचएमआयएलचे एफडीसीआयसोबतच्या भागीदारीचे हे सलग चौथे वर्ष असून यामध्ये भारतीय कारागिरी,कलाकुसर आणि देशाच्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा साजरा केला जातो. ह्युंदाई इंडिया कुटुर वीक या कार्यक्रमात फाल्गुनी शेन पीकॉक, रोहित बाल,हाऊस ऑफ मसाबा, जेजे वलया, तरुण ताहिलियानी, ईशा जाजोदिया यांचे रोझ रूर्म,रिमझिम दादू,अर्पिता मेहता,कुणाल रावल,डॉली जे, जयंती रेड्डी, आयशा राव आणि राहुल मिश्रा इत्यादींचा समावेश आहे. हा उपक्रम 24 ते 29 जुलै 2026 दरम्यान नवी दिल्लीतील ताज पॅलेस हॉटेलमध्ये आयोजित केला जाणार आहे.

### टेमघर धरण ५० टक्के भरले; महिनाभराच्या पाण्याचा दिलासा

पुणे (आरंभ पर्व) : लवार्डे (ता.मुळशी) येथील टेमघर धरणातील पाणी साठा पन्नास टक्क्यावर पोचला आहे. या साठ्यावर पुणेकरांची एक महिन्याची तहान भागणार आहे. पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, परिसर व पाणलोटक्षेत्रात दमदार पाऊस होत असल्याने या धरणात आज बुधवारी (ता.२२) रोजी सकाळी ४८.९१ टक्के पाणी साठा झाला आहे. या हंगामात या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आज अखेर १५३६ मीमी इतका पाऊस झाला असून १.८१ टीएमसी इतका पाणी साठा झाला आहे. सन २०१० मध्ये या धरणाची साठवण क्षमता दहा मीटर उंचीने वाढविण्यात आल्याने पाण्याची साठवण क्षमताही दीड टीएमसीने वाढली आहे. धरणाची गळती थांबविण्यासाठी सलग तीन वर्षे सातत्याने ग्राउटिंगचे काम करावे लागले होते. त्यानंतरही सुमारे ९३ टक्के गळती थांबली असून अद्याप ७ टक्के गळती सुरू आहेच. टेमघर प्रकल्प उपविभाग क्र. १ चे उपअभियंता गणेश गवळी म्हणाले ,"येथील धरणाची उर्वरित गळती थांबण्यासाठी गेल्या महिन्याभरापासून ग्राउटिंगचे काम हाती घेतले आहे. सध्या पावसाळा सुरू झाल्याने हे काम थांबविण्यात आलेले आहे. पावसाळा संपल्यावर साधारण डिसेंबर नंतर हे काम पुन्हा हाती घेणार आहोत. गळती कमी करण्यासाठी ड्रिलिंग, ग्राऊंटिंग व शॉटक्रिटची कामे करावी लागणार आहेत."

### मुलींच्या वसतिगृहात मध्यरात्री गॅस गळती, अनर्थ टळला

पुणे (आरंभ पर्व) : जी एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहातील कॅन्टीन मध्ये मंगळवारी मध्यरात्री गॅस गळती झाल्याचा गंभीर प्रकार घडला. सुदैवाने आग लागली नाही. पाणी पिण्यासाठी बाहेर आलेल्या मुलीच्या लक्षात आल्याने तिने आरडा ओरडा केला. यानंतर सर्व मुलींना बाहेर काढून गॅस गळती बंद करण्यात आली. कॉलेजच्या संकुलात योको स्टेज नावाने हे वसतिगृह आहे. ३२० मुलींची क्षमता असलेल्या या वसतिगृहात १७० मुली येथे राहतात. मंगळवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास एक मुलगी पहिल्या मजल्यावरील कॅन्टीन मध्ये पाणी पिण्यासाठी आली. तिला गॅसचा वास आला. तसेच सगळीकडे गॅस पसरलेला दिसला. हा प्रकार बघून ती घाबरली. तिने आरडा ओरडा केला. यानंतर बाकी मुली व वसतिगृहातील महिला खाली आल्या. यानंतर सर्व मुलींना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर संबंधित लोकांना बोलावून गॅस गळती रोखण्यात आली. यामध्ये दीड ते दोन तास गेले. तो पर्यंत भर रात्री मुली वसतिगृहा बाहेरच होत्या. गॅस गळती रोखून गळती झालेला गॅस बाहेर गेल्यानंतर मुलींना वसतिगृहात सोडण्यात आले. सुदैवाने कोणतीही आग लागली नाही. अन्यथा अनर्थ घडला असता. वसतिगृहाबाबत अनेक तक्रारी आहेत. त्या इमारती जवळ उंदीर, साप व अन्य अनेक प्राणी निघतात.

### कार्बन क्रेडिटमधून पर्यावरण संवर्धन अन उत्पन्नवाढ

पुणे (आरंभ पर्व) : पर्यावरणपूरक प्रकल्प केवळ प्रदूषण कमी करण्यापुरते मर्यादित न राहता आता महापालिकेसाठी उत्पन्नाचे साधन ठरणार आहेत. घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, बायोगॅस, सौर ऊर्जा, ई-बस आणि एलईडी पथदिवे यांसारख्या प्रकल्पांमधून कार्बन क्रेडिट मिळवून त्याची विक्री करण्याचा प्रस्ताव पुणे महापालिकेत पुढे आला आहे. यामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच महापालिकेला अतिरिक्त महसूल मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जागतिक स्तरावर हवामान बदल, वाढते प्रदूषण आणि हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे कार्बन क्रेडिट बाजाराला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतानेही २०७० पर्यंत 'नेट-झिरो' उत्सर्जनाचे लक्ष्य जाहीर केले असून, केंद्र सरकार कार्बन क्रेडिट ट्रेडिंग यंत्रणा विकसित करत आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांनीही पर्यावरणपूरक प्रकल्पांचे आर्थिक रूपांतर करून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करण्यावर भर दिला आहे. पुणे महापालिकेकडे आधीपासूनच सांडपाणी प्रक्रिया केंद्रे, घनकचरा व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प, सौर ऊर्जा प्रकल्प, एलईडी पथदिवे, ई-बस, वृक्षारोपण, बांधकाम व पाडकाम कचरा पुनर्वापर आणि सांडपाण्याचा पुनर्वापर असे अनेक प्रकल्प कार्यान्वित आहेत. या प्रकल्पांमुळे वातावरणात जाणारे कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी होते.

# चासकमान धरण ९४ टक्के भरले

## भीमा नदीत ५००० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



खेड तालुक्याच्या पश्चिम भागात संततधार पावसामुळे चासकमान धरणातील पाणीसाठा वेगाने वाढत आहे. बुधवारी (दि.२२) सकाळी सात वाजता धरणातील पाणीसाठा ९४.२९ टक्के पेक्षा अधिक झाल्याने धरणाचे पाचही वक्र दरवाजे उघडण्यात आले. यातून नदीपात्रात सकाळी ३५०० क्युसेक्स वेगाने पाणी सोडण्यात आले. तर पाण्याची आवक पाहता दुपारी ५००० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. तसेच कालव्याद्वारे ३०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

चासकमान धरण हे ८.५३ टीएमसी पाणीक्षमता असलेले शिरूर व खेड तालुक्यासाठी महत्त्वाचे धरण आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. ओढे-नाल्यांना पुर आल्याने हे पाणी थेट धरणात जमा होते. यामुळे धरणातील पाणीसाठा सातत्याने वाढत आहे. यासोबतच, कळमोडी धरण यापूर्वीच ७ जुलै रोजी ओव्हरफ्लो झाले होते.

चासकमान धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १ जूनपासून आतापर्यंत तब्बल ५७९ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणी पातळी झपाट्याने वाढली असून, ९४ टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरणार असल्याने सुरक्षिततेचा उपाय म्हणून दरवाजे उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. या विसर्गामुळे भीमानदीची पाण्याची पातळी वाढली आहे. दरम्यान, संततधार पावसामुळे धरणात पाण्याची आवक चांगली आहे. सुरक्षिततेचा उपाय म्हणून आणि पाणीसाठा नियंत्रणात ठेवण्यासाठी दरवाजे उघडण्यात आले आहेत. पुढील काही दिवसांतही पावसाचा जोर कायम राहिल्यास, धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग वाढवावा लागू शकतो. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेव असून, भीमा नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, कोणीही नदीपात्रात उतरू नये. तसेच नदीमधील पाण्याचे पंप, नदी काठावरील शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावीत. असे आवाहन चासकमान पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मो. ता. जाधवर यांनी केले आहे.

## ‘विलास चाफेकर स्मृती पुरस्कार’ श्रीनिवास कानडे यांना जाहीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



समाजातील वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर कार्य करणारे वंचित विकासचे संस्थापक दिवंगत विलास चाफेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' यंदा श्रीनिवास कानडे यांना जाहीर करण्यात आला आहे. वंचित विकास संस्थेतर्फे येत्या शनिवारी (ता. २५ जुलै) सायंकाळी ४.३० वाजता बीएमसीसी कॅम्पसमधील सायरस पुनावाला ऑडिटोरियममध्ये पुरस्कार वितरण होणार आहे. यावेळी 'करावा विठ्ठल' हा पंढरपूरच्या वारीवरील संगीत आणि नाट्य यांची सांगड घालणारा विशेष सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात येणार आहे. विलास चाफेकर यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचावीत या ध्येयाने निःस्वार्थपणे कार्य केले. त्यांच्या सामाजिक कार्याला अभिवादन करण्यासाठी दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून यंदा श्रीनिवास कानडे यांना 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. कल्याणी ग्रुप मध्ये कार्यरत असल्यापासून विविध सामाजिक संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याचे काम केले आहे. तसेच गरवारे महाविद्यालयाच्या १९७३ बॅच असोसिएशन मार्फत कानडे व त्यांचा मित्रपरिवार सामाजिक कार्यात सक्रियपणे काम करीत आहे.

## प्रीमियम अनुभवांचा खर्च परवडू लागला आहे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनेक वर्षांपासून, भारतातील प्रीमियम क्रेडिट कार्ड्स गोल्फ खेळाची संधी, कॉन्सिअर्ज सेवा, रिवॉर्ड पॉइंट्स आणि विमानतळावरील लाउंज प्रवेश यांसारख्या फायद्यांद्वारे श्रीमंत वर्गाचा विशेषाधिकार दर्शवत होते. हे घटक अशा वेळी महत्त्वाचे होते जेव्हा श्रीमंती मर्यादित होती. कोटक महिंद्रा बँकेने सांगितले की, विशेषाधिकाराची ही व्याख्या आता बदलत आहे. मनोरंजन, डायनिंग आणि सांस्कृतिक अनुभवांच्या बाबतीत श्रीमंत ग्राहक वाढत्या प्रमाणात सर्वोत्तम क्षणांकडे आकर्षित होत आहेत, जे दुर्मिळ, स्मरणीय आणि पुन्हा अनुभवण्यास कठीण आहेत. अनेक वर्षांनंतर सादरीकरण करणारा एखादा आवडता कलाकार, कॉन्सर्टमधील समोरच्या रांगेतील जागा किंवा विशिष्ट कालावधीसाठी उपलब्ध असलेला खास मेजवानीचा मेनू यांना पैशांच्या व्यवहारापलीकडचे मोल असते. अनुभव हीच आजही मुख्य महत्त्वाकांक्षा आहे; बदलली आहे त्याभोवती असणारी स्पर्धा. अनुभवांना वाढते महत्त्व दिले जात आहे, कारण बहुतांश उत्पादनांपेक्षा वेगळे म्हणजे, हे अनुभव एका विशिष्ट वेळेत आणि क्षणाशी बांधलेले असतात. एखादे उत्पादन नंतरही खरेदी केले जाऊ शकते, पण एखादी कॉन्सर्ट, शेफच्या नेतृत्वाखालील खास भोजनाचा कार्यक्रम किंवा एखादे सांस्कृतिक सादरीकरण नंतर मिळू शकत नाही, असे बँकेने नमूद केले आहे.

# विद्यार्थ्यांना रेनकोट व शालेय साहित्य वाटप

## सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपक्रमाचे आयोजन

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

वाफगाव (ता. खेड) येथील जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना रेनकोट , शालेय साहित्य व वह्या वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते शैलेश मांदळे व सारिका मांदळे यांच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शालेय विद्यार्थी, शिक्षक ,पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये व येथील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळाव्यात या उद्देशाने वाफगाव येथील मराठी शाळा व अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व वह्या वाटप हा उपक्रम राबविला. सध्या पावसाळा असल्याने विद्यार्थ्यांचे पावसामुळे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सर्व विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले असल्याचे सारिका मांदळे यांनी सांगितले.



हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

गावातील ग्रामस्थांचे जिल्हा परिषद शाळेकडे नेहमीच लक्ष आहे. त्यामुळे शाळेला मोठ्या प्रमाणात भौतिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत व विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला असल्याचे शिक्षकांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश कराळे माजी अध्यक्ष गणेश सुर्वे, उद्योजक शैलेश मांदळे , माजी उपसरपंच नंदकुमार सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य अमोल कराळे, मुरलीधर दौंडकर, रज्जाकभाई इनामदार, शरद थिटे, सामाजिक कार्यकर्ते अमर बोऱ्हाडे, राजेंद्र कराळे, दिलीप कंगणे, सचिन मोरवे, सागर खोले व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी शिक्षक रामदास येवले, द्वारका कुदळे, विजय गायकवाड, राजश्री जाधव, शिला थिटे, ज्योती कंगणे आदी उपस्थित होते.

# दुर्मिळ जोखमीच्या जुळ्या गर्भधारणेत आशेचा किरण

## जुळ्या बाळा पैकी एकाला डोके आणि हृदय नसल्याने गर्भावस्था धोक्याची

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फीटल मेडिसिन क्षेत्रात उल्लेखनीय यश दर्शवत पुण्यातील नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर येथील डॉक्टरांच्या टीमने अत्यंत दुर्मिळ व जोखमीच्या गर्भातील जुळ्या बाळांवर फीटल थेरपी मायक्रोवेव्ह अॅब्लेजन ही आधुनिक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. या प्रक्रियेद्वारे मोनोकोरियोनिक ट्वीन प्रेगनेंन्सी (एकाच नाळेला - प्लासेंटाला जोडलेली जुळी गर्भावस्था) या गुंतागुंतीच्या स्थितीवर यशस्वीरित्या उपचार करून निरोगी बाळाच्या जगण्याची शक्यता लक्षणीयरित्या वाढली आहे. ही प्रक्रिया नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर येथील फीटल मेडिसिन तज्ञ कन्सल्टंट डॉ.तेजस ताम्हाणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.त्याचबरोबर टीममध्ये वरिष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. संतोष सिदीड,बहुशाखीय टीममध्ये डॉ.पंकज गोयल,डॉ.आदिती अबनावे,डॉ.नेहा कोल्हे,भूलतज्ञ व परिचारिकांचा समावेश होता.

या गर्भधारणेमध्ये ही जुळी एकाच नाळेला जोडली गेली होती. या स्थितीला मोनोकोरियोनिक ट्वीन प्रेगनेंन्सी असे म्हणतात. त्यापैकी एका बाळाला डोके अणि हृदय हे मुख्य अवयव तयार झाले नव्हते तर दुसऱ्या बाळाचे सर्व अवयव व्यवस्थित तयार झाले होते. अशा प्रकारच्या जुळ्या गर्भावस्थेला अकार्डीयाक ट्वीन किवा टीआरएपी सिक्वेन्स असे शास्त्रीय भाषेत मध्ये म्हटले जाते. सदर रुग्ण गर्भावस्थेतील बाराव्या आठवड्यात डॉ. तेजस ताम्हाणे यांच्याकडे सेकंड ओपिनियनसाठी सोनोग्राफीसाठी आल्या होत्या. त्यावेळी अल्ट्रासाऊंड चाचणीमध्ये या गर्भधारणेत ट्वीन रिव्हर्स आर्टेरिअल परफ्युजन (टीआरएपी) सिक्वेंस हीअत्यंत दुर्मिळ परिस्थिती असल्याचे निदान त्यांनी केले. साधारणत: 35000 गर्भावस्थांमध्ये केवळ एका महिलेमध्ये ही स्थिती उद्भवण्याची शक्यता असते. टीआरएपी सिक्वेंस या स्थितीत जुळ्यांमधील एकामध्ये कार्यरत हृदय आणि मेंदू विकसित होत नाही,याला अकार्डियाक ट्वीन असे म्हणतात.पोटातील दुसऱ्या अर्भका (पंप ट्वीन) कडून मिळत असलेल्या रक्तपुरवठ्यामुळे असामान्य अर्भक म्हणजे अकार्डियाक ट्वीन हे जिवंत राहते.मात्र यामुळे निरोगी अर्भकाच्या हृदयावर प्रचंड ताण येऊ शकतो व हृदय निकामी होणे, बाळा भोवती अतिरिक्त पाणी तयार होणे, मुदतपूर्व प्रसूती किंवा उपचार न केल्यास दोन्ही बाळांचा जीव जाण्याची शक्यता असते. याबाबत माहिती देताना नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटरचे फीटल मेडिसिन तज्ञ डॉ.तेजस ताम्हाणे म्हणाले की, पुण्यातील एक 32 वर्षीय महिला अल्ट्रासाउंड चाचणीनंतर सेकंड ओपिनियन घ्यायला आमच्याकडे आली.या स्कॅनमध्ये या दुर्मिळ गुंतागुंतीचे निदान झाले. या दाम्पत्याला आधी वाटले होते की,गर्भपात हाच एक पर्याय असू शकतो,मात्र या स्थितीबाबत त्यांच्याशी सखोल संवाद आम्ही साधला आणि त्यांना आधुनिक फीटल थेरपी प्रक्रियांबाबत माहिती दिली.

## विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि शैक्षणिक साहित्याअभावी त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने स्टारलाईट म्युझिकल इव्हेंट्स आणि अविरत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोसलेवाडी तसेच रोकडोबानाथ विद्यालय, भांडगाव येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. यावेळी स्टारलाईट म्युझिकल इव्हेंट्स आणि अविरत फाउंडेशनचे आकाश जाधव, वंदना वशिष्ठ आणि रूपाली लाहोटी उपस्थित होते. भोसलेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक समद पठाण, दिपाली माळी, राजेंद्र जगताप, सचिन गुंड आणि अमोल भोसले उपस्थित होते. तसेच रोकडोबानाथ विद्यालय, भांडगाव येथील मुख्याध्यापक सतीश कदम, नेवसे सर, मारुती पवार, दीपक थोरात, गाडेकर सर आणि रत्नपारखी मॅडम यांची उपस्थिती होती. या उपक्रमासाठी अविरत फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमाताई लाळगे तसेच सदस्य त्रिशाला वर्मा, अनोद गोस्वामी, दीपक फुलझेले, सचिन कुंभार आणि गणेश गोंजारे यांनी विशेष सहकार्य केले.

# लोणी काळभोर पोलिसांकडून अंमली पदार्थविरोधी जनजागृतीचे धडे

## महिला सुरक्षा, सायबर गुन्हे आणि ऑनलाइन फसवणुकीबाबत मार्गदर्शन; शंभरहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**




लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या वतीने युवक-युवतींमध्ये कायद्याविषयी जागरूकता वाढविणे, अंमली पदार्थमुक्त समाज निर्माण करणे आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नागरिकांना सजग करणे या उद्देशाने अशा प्रकारचे जनजागृती उपक्रम नियमितपणे राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मेहेर तसेच सायबर विभागातील महिला पोलीस अंमलदार थोरात यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य घोडके, प्राध्यापकवर्ग तसेच सुमारे ९० ते १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले.

लोणी काळभोर पोलीस ठाणे, पुणे शहर यांच्या वतीने समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात अंमली पदार्थविरोधी जनजागृती, महिला सुरक्षा आणि सायबर सुरक्षाविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवक-युवतींमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच अंमली पदार्थांच्या विळख्यापासून तरुण पिढीला दूर ठेवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर येथे मंगळवार, दि. २१ जुलै रोजी हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात इयत्ता अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम, व्यसनामुळे व्यक्तीच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनावर होणारा विपरीत परिणाम तसेच विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांपासून दूर राहण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत पोलिसांनी सविस्तर माहिती दिली. अंमली पदार्थांच्या आहारी न जाता स्वतःबरोबरच मित्र-मैत्रिणींनाही व्यसनांपासून दूर ठेवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. महिला आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने कायदेशीर तरतुदी, संकटाच्या वेळी पोलिसांची मदत कशी घ्यावी तसेच कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा संशयास्पद प्रकार घडल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तातडीने माहिती देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले. समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर, अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती सामायिक न करणे, संशयास्पद संदेश किंवा दुव्यांपासून सावध राहणे, संकेतशब्द सुरक्षित ठेवणे आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. मार्गदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थ, महिला सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांसंदर्भात विविध प्रश्न विचारले. पोलिसांनी त्यांच्या शंकांचे निरसन करत प्रत्यक्ष जीवनात कोणती खबरदारी घ्यावी याबाबत माहिती दिली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.